# दि आष्टा पीपल्स को-ऑप.बँक लि.,आष्टा. ता.वाळवा, जि.सांगली

THE ASHTA PEOPLE'S CO-OP. BANK LTD. ASHTA 24087 20/2/60

# लॉकर धोरण
# (Locker Policy)

रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक DOR.LEG.REC/40/09.07.005/2021-22 दि.१८.०८.२०२१ नुसार त्यांनी सेफ डिपॉझिट लॉकर/सुरक्षित कस्टडी सुविधा प्रदान करणा-या रिझर्व्ह बँकेच्या आधिन सर्व बँकांना सुधारित लॉकर नियमावली/मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. मा.संचालक मंडळ सभा दिनांक २८.१२.२०२१ ठराव नं.१० ने वरील प्रमाणे धोरणास मंजुरी देणेत येत असून त्याअन्वये सन २०२१-२२, २०२२-२३ सालासाठी खालीलप्रमाणे लॉकर धोरण (LockerPolicy) निश्चित करणेत आले आहे. त्याचे पुर्नरावलोकन मा.संचालक मंडळ मिटींग दि.१७.०५.२०२२ ठराव नं.१२ व मा.संचालक मंडळ मिटींग दि.१७.०१.२०२३ ठराव नं.२० मध्ये करणेत आले. तद्नंतर मा.संचालक मंडळ मिटींग दि.०५.०६.२०२३ ठराव नं.१० मध्ये व मा.संचालक मंडळ मिटींग दि.०७.०२.२०२४ ठराव नं.१२ व दि.३१.०५.२०२४ ठराव नं.९ मध्ये पुर्नरावलोकन करून सन २०२३-२४, २०२४-२५ सालासाठी करणेत आलेल्या धोरणाचे मा.संचालक मंडळ मिटींग दि.०१.०२.२०२५ ठराव नं.११ व मा.संचालक मंडळ मिटींग दि.३१.०५.२०२५ ठराव नं.१० मध्ये करणेत येवून खालीलप्रमाणे लॉकर धोरण (LockerPolicy) सन २०२५-२६ सालासाठी निश्चित करणेत आले आहे.

**प्रस्तावना :-**

दागदागिने, जड-जवाहीर व इतर तद्नुषंगिक अनमोल वस्तू, कागदपत्रे, मुळ दस्ताऐवज, प्रमाणपत्रे इ. घरात ठेवणे म्हणजे खूप मोठी जोखीम..। चोर, दरोडेखोर व नैसर्गिक आपत्तीची भिती..। यामुळे सर्वांच्या मनामध्ये असुरक्षिततेचे आणि भितीचे वातावरण तयार झालेले असते. दागदागिने व तद्नुषंगिक अनेक अनमोल वस्तूंची सुरक्षितता जपण्यासाठी, सधन व मध्यमवर्गीय अशा सर्वच स्तरातील, जनसामान्यांसाठी बँकांना लॉकर सुविधेचा अवलंब केलेला आहे. सदरचे लॉकर्स बँकेच्या ग्राहकांना भाडे तत्वावर दिले जाते. ही सुविधा इतर बँकींग सुविधांपैकी एक सुविधा आहे. ही सुविधा आपल्या बँकेने ग्राहकांसाठी देणेत आलेली आहे.

रिझर्व्ह बँकेकडील परिपत्रक क्र.RBI/2021-2022/86/DoR/LEG/40/09.07.005/2021-22 Dt. 18/08/2021 च्या परिपत्रकाप्रमाणे व वेळोवेळी दिलेल्या सूचनेप्रमाणे बँकेकडील खातेदाराच्या सेवेकरीता लॉकर संबंधी धोरण तयार करणेत आलेले असून ते खालीलप्रमाणे राहील.

**१) व्याख्या -**

१.१ बँक म्हणजे "दि आष्टा पीपल्स को.ऑपरेटिव्ह बँक लि.,"

१.२ खातेदार म्हणजे बँकेचे सभासद, ठेव व कर्ज खातेदार व ज्यांना लॉकर संबंधीत सुविधा आवश्यक आहे ते.

१.३ रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी लॉकर संबंधी नियमावली तयार करणारी ॲथॉरीटी होय.

१.४ नियम - बँकेचे पोटनियम व रिझर्व्ह बँकेने सूचीत केलेले नियम.

१.५ बँक व लॉकरधारक यांच्यातील संबंध हे लॉकर मालक(Lessor) व लॉकर भाडेकरु हे (Lessee) असतील. बँक व ग्राहक (कस्टमर) असे असणार नाहीत.

१.६ आपला ग्राहक ओळखा (KYC) - रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार व बँकेच्या KYC धोरणाप्रमाणे घ्यावयाची कागदपत्रे.

**२) सेफ डिपॉझीट लॉकर -**

२.१ ग्राहक म्हणजे, बँक खालील खातेदारांना लॉकर सेवा उपलब्ध करुन देईल.

i) जे व्यक्तीगत/संयुक्तीक/प्रशासक/व्यवस्थापक/कायदेशीर वारसदारक.
ii) प्रोप्रायटरशिप
iii) भागीदारी फर्म यामधील भागीदार
iv) हिंदू अविभक्त कुंटूब
v) लिमिटेड कंपनी

vi) सहकारी संस्था

vii) ट्रस्ट

वरील ग्राहक हे लॉकर सुविधेस पात्र असतील.

२.२ खातेदारांनी बँकेकडील रितसर लॉकर मिळणेबाबत अर्ज शाखेकडे सादर करणे आवश्यक आहे. लॉकर संबंधीचा अर्ज शाखेकडे उपलब्ध असेल.

२.३ शाखेकडे लॉकर उपलब्ध असतील तर ग्राहकांचे रितसर अर्ज व ''आपला ग्राहक ओळखा'' याची पूर्तता करतो त्यांना देण्यात येईल आणि जर उपलब्ध नसतील तर त्याची वेटींग लिस्ट तयार करण्यात येईल व जसे उपलब्ध होतील त्याप्रमाणे First Come First Base या तत्वावर देण्यात येईल.

२.४ लॉकर खातेदारांना देण्यासंबंधी शाखेकडून निर्णय झाल्यास खालील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२.४.१ KYC ची १००% पूर्तता करणे आवश्यक आहे.

२.४.२ ग्राहकांना लॉकर व्यवहार करणेचा अधिकार असेल त्यांनी पत्ता, फोटो, फोन नं., मोबाईल नं. व शाखेकडील सेव्हिंज, चालू खाते तपशिल देणे आवश्यक आहे व सदरच्या नोंदी/माहीती अद्यावत देणेची जबाबदारी लॉकरधारकाची राहील.

२.४.३ नियमाप्रमाणे करारपत्र व इतर कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे.(सध्या रु.५००/- स्टँपबाबत वेळोवेळी जे लागतात त्या रक्कमेचा देणे आवश्यक राहील.)

२.४.४ ग्राहक व बँक यांच्यातील झालेल्या करारपत्राची झेरॉक्स प्रत लॉकरधारकास दिली जाईल व मुळ प्रत बँकेकडे राहील.

२.४.५ लॉकर जर संयुक्त (Joint) नांवाने सुरु करावयाचे असेल तर जास्तीत जास्त ४ व्यक्तींच्या नांवाने सुरु करता येईल. (सर्वांची केवायसी पूर्तता असणे आवश्यक आहे.) सर्वांनी करारपत्रावर सह्या करणे आवश्यक राहील आणि अधिकार व व्यवहार करणेबाबत नोंद करणे आवश्यक राहील.

२.४.६ जर एका नावाने लॉकर खाते सुरु असेल व जर खातेदारांनी तो लॉकर संयुक्त करणेबाबत अर्ज दिलेला असेल तर नवीन खातेदाराची KYC, नवीन करारपत्र व स्टँप घेवून लॉकर व्यवहार (ऑपरेट) करणेत येईल.

२.४.६.१. जर संयुक्त नावाने लॉकर असेल व ते एका व्यक्तीच्या नावे करणार असतील तर ते करता येईल. त्यासाठी संयुक्त नावाने अर्ज करणे आवश्यक राहील.

२.४.७ लॉकरधारकाचे बँकेत चालू/सेव्हिंज खाते असणे बंधनकारक राहील. जर उघडले नसेल तर उघडणे आवश्यक आहे.

२.४.८ धर्मादाय संस्था/सहकारी संस्थांना लॉकर भाडे तत्वावर देताना संस्थेचा ठराव, पोटनियम प्रत, संस्था नोंदणी दाखला संस्था, KYC व ज्यांना सह्यांचे अधिकार दिलेले आहेत त्यांची KYC /ठराव याची पूर्तता १००% करणे आवश्यक राहील.

२.४.९ जर लॉकर HUF नावाने सुरु करावयाचे असेल तर त्यांनी रितसर HUF मधील व्यक्तीच्या नावाची यादी (Declaration) देणे आवश्यक आहे. HUF चा कर्ता जो असेल त्याची KYC देणे आवश्यक आहे. HUF नावाने सुरु होणारे लॉकर हे वैयक्तिक नावाने सुरु करता येईल. संयुक्त नावाने सुरु करता येणार नाही.

२.४.१० जर लॉकर कंपनीच्या नावाने सुरु करावयाचे असेल तर त्यांनी कंपनीचा ठराव, मेमोरँडम ऑफ अर्टिकलस्, मेमोरँडम ऑफ अँडरस्टँडिंग, नोंदणी दाखला, व्यवहार करणेस संचालकाच्या सह्याचे अधिकारबाबत ठराव/KYC ची पूर्तता करुन देणे आवश्यक आहे.

२.४.११ जर लॉकर भागीदारी फर्मच्या नावाने सुरु करावयाचे असेल तर नोंदणी दाखला/ठराव/भागीदारी रजिस्टरची प्रत/व्यवहार करणेचा सहीचा अधिकारबाबत ठराव/KYCची पूर्तता करुन देणे आवश्यक आहे.

२.४.१२ जर लॉकर प्रोप्रायटरशिप फर्मच्या नावाने सुरु करावयाचे असेल तर त्यांनी संस्था नोंदणी दाखला व KYC ची पूर्तता करुन देणे आवश्यक आहे.

२.४.१३ अज्ञान व्यक्तीच्या नावाने लॉकर खाते सुरु करता येणार नाही.

## ३) लॉकरधारकाचे जोखीम व्यवस्थापन - (Risk Categorization)

३.१ बँकेकडील सध्याचे लॉकरधारकाचे Customer Due Diligence (CDD) करणेत येईल व नवीन लॉकरधारकाचे CDD केले जाईल.

३.२ सर्व लॉकरधारकाचे Risk Categorization करणेत येईल. (Medium/High)

३.३ Risk Categorization हे सध्याचे व नवीन घेणारे लॉकरधारक यांचे देखील करणेत येईल. सेव्हींग व चालू खात्याचे बेसनुसार, Risk Categorization प्रमाणे लॉकरचे Categorization करणेत येईल. सदरचे Risk Categorization व CDD हे रिझर्व्ह बँकेच्या KYC च्या परिपत्रकाअन्वये व बँकेच्या KYC धोरणाप्रमाणे करणेत येईल.

३.४ जे लॉकरधारक Medium Risk Category मध्ये आहेत व त्यांनी जर सलग ३ वर्षांत लॉकर Operate केले नाही, त्या लॉकरधारकास शाखेकडून लेखी पत्र/SMS द्वारे लॉकर Operate करणेबाबत कळविणेत येईल व जर लॉकरधारकास नोटीस पाठवून देखील ते बँकेमध्ये आले नाही तर त्यांचे लॉकर Inoperative केले जाईल. जरी लॉकर भाडे प्रतीवर्षी भरत असेल तरी देखील व्यवहार थाबविणेत येईल. बँकेत असे खातेदार आलेनंतर त्याची पुन्हा नवीन KYC घेतली जाईल व त्यांचे लॉकर ऑपरेट केले जाईल. जर लॉकरधारकाने योग्य कारण सादर केलेस त्यास लॉकर वापर करणेस बँकेस अधिकार दिले जाईल. असे लॉकर व्यवहार पुन्हा करुन द्यावयाचे कि नाही याचा अधिकार बँकेस राहील.

३.५ जे लॉकरधारक High Risk Category मध्ये आहेत व त्या लॉकरधारकांनी वर्षातून एकदा लॉकर Operation करणे सक्तीचे राहील. जर त्यांनी लॉकर Operate केले नाहीतर त्यांना लेखी पत्र अथवा SMS पाठवून लॉकर Operate करणेबाबत सूचना देणेत येईल. जर लॉकरधारकास नोटीस पाठवून देखील ते बँकेमध्ये आले नाहीतर त्यांचे लॉकर Inoperative केले जाईल. बँकेत अशा लॉकरधारकास लॉकर का ऑपरेट केले नाही? असा विचारण्याचा अधिकार बँकेस राहील. सदरचे लॉकर पुन्हा ऑपरेट करुन दयावयाचे की – नाही हा निर्णय घेणेचा अधिकार बँकेस राहील. जर लॉकरधारकाने बँकेस काही कळविले नाही तेव्हा ते लॉकर ब्रेक-ओपन करणेचा अधिकार बँकेवर राहील.

३.६ लॉकरधारकांना बँकेच्या कोणत्या शाखेमध्ये आपले लॉकर आहे हे ओळखण्यासाठी प्रत्येक शाखेमध्ये Key Embossing शाखेकडून करुन देणेत येईल. जे जुने लॉकर आहेत त्याच्याकरीता Key Embossing करुन दिले जाईल. तसेच जे नवीन लॉकर शाखेमध्ये घेतले जातील त्यांचे त्यावेळीच Key Embossing करुन दिले जाईल.

३.७ जे लॉकर वापरात नसलेले (Non-Operative) आहेत, या खातेवर ३ वर्ष भाडे भरले नसलेस ते लॉकर ब्रेक-ओपन करणेचा अधिकार बँकेस राहील. लॉकर ब्रेक-ओपन करण्याची प्रक्रिया नियम क्र.९ प्रमाणे बँक करेल.

## ४) लॉकर डपॉझीट –

४.१ प्रत्येक लॉकरधारकाने नियमाप्रमाणे लॉकर डिपॉझीट भरणे सक्तीचे आहे. सदरची लॉकर डिपॉझीट रक्कम वेळोवेळी बँक ठरविल त्याप्रमाणे देणे आवश्यक आहे. सदर लॉकर डिपॉझीट रक्कम वेळोवेळी बदलण्यांचा अधिकार बँकेस राहील, सध्या ती कमीत कमी रू.५000/- ते जास्तीत जास्त रु.५०,०००/- आहे.

४.२ लॉकर डिपॉझिटवर ठेवीच्या दराने व्याज दिले जाईल.

४.३ जर खातेदाराने प्रतीवर्षी लॉकर भाडे भरले नाही अथवा सलग ३ वर्षे कोणतेही व्यवहार केले नाहीत तर ते लॉकर ब्रेक करताना होणारा खर्च व भाडे हे लॉकर कि डिपॉझीट मधून वसूल केले जाईल व खातेदारास लेखी कळविले जाईल.

४.४ लॉकर डिपॉझीट ज्या खातेदारांची कमी आहे अथवा ज्यांची डिपॉझिट नाही; ती रक्कम खातेदाराकडून ताबडतोब भरणे आवश्यक आहे.

४.५ सध्याचे लॉकरधारक – लॉकर डिपॉझिट याची पूर्तता करीत नसतील तर अशा लॉकरधारकाचे लॉकर बंद करणेचा अधिकार बँकेस राहील. याबाबत खातेदारास लेखी कळवून बंद करणेत येईल अथवा पुढील व्यवहार करता येणार नाहीत. असे लॉकर खाते Inoperative करणेचा अधिकार बँकेस राहील. बँकेच्या नियमाप्रमाणे लॉकर डिपॉझिट भरलेनंतरच लॉकरधारकास व्यवहार करणेस बँक परवानगी देईल.

## ५) वारस नोंद –

५.१ प्रत्येक लॉकरधारकाला लॉकर खातेवर वारसाची नोंद करता येईल.

५.२ वारस नोंद बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट, १९४९ (AACS) मधील कलम ४५ ZC ते ४५ ZF व नामनिर्देश नियम १९८५ अन्वये करणेत येईल.

५.३ फक्त एकाच वारसदाराची नोंद ही व्यक्तीगत राहील.

५.४ सहकारी संस्था/धर्मादाय संस्था/कंपनी/भागीदारी/LLP यांच्या नावाने लॉकर असेल तर त्याची वारस नोंद करता येणार नाही.

५.५ अज्ञानपालकास वारस म्हणून नोंद करता येईल. यासाठी आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणे आवश्यक आहे.

५.६ जे लॉकर संयुक्तपणे सुरु केले असेल तर त्यास वारस नोंद करणेची सोय राहील.

THE ASHTA PEOPLE'S CO-OP. BANK LTD. 24087 20/2/60

५.७ NRI व्यक्तीस वारस म्हणून नोंद करता येणार नाही.
५.८ वारस नोंदीमध्ये वेळोवेळी बदल करणेचा अधिकार लॉकरधारकास राहील. यासाठी वारस नोंदीचा फॉर्म खातेदाराने स्वतंत्रपणे भरुन देणे आवश्यक आहे.
५.९ वारस नोंदीसंबंधी स्वतंत्र रजिस्टर ठेवले जाईल.

**६) लॉकरभाडे –**

६.१ बँक वेळोवेळी ज्या दराने लॉकर भाडे ठरवील ते भाडे प्रतीवर्षी भरणे आवश्यक आहे.
६.२ लॉकर भाडे आकारणी वार्षिक असेल व ती पूर्ण वर्षाची आगाऊ भरणे आवश्यक आहे.
६.३ ज्या महिन्यात लॉकर सुरु झाले तो महिना पूर्ण धरणेत येईल. तेथुन पुढे १२ महिने लॉकर भाडे घेण्यात येईल. सदरचे भाडे ज्या त्या वर्षाच्या नफातोटा खाती पूर्णपणे जमा घेणेत येईल. लॉकरधारकाकडून भाडे + वेळोवेळी लागू असलेले कर (GST) भरणे आवश्यक आहे.
६.४ लॉकर भाडयामध्ये वेळोवेळी बदल करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील. बदललेले दर व सध्याचे दर बँकेच्या नोटीस बोर्डावर व बँकेच्या वेबसाईटवरती वेळोवेळी प्रसिध्द केले जातील.
६.५ जर लॉकरधारकाने भाडे भरले नसलेस, सदरचे भाडे त्याचे बँकेत असलेल्या सेव्हींग/चालू/ओव्हरड्राफ्ट/ कॅशक्रेडीट/मुदत ठेव खातेमधून वसुल केले जाईल. अशा ठेव खातेवर भाडे वसूल करणेचा अधिकार बँकेस राहील. याबाबत लॉकरधारकास कळविले जाणार नाही.
६.६ लॉकर भाडे प्रलंबित असेल तर त्यास लॉकर व्यवहार करता येणार नाही. भाडे भरुन घेवूनच त्यांना लॉकर व्यवहार करता येईल.
६.७ लॉकरभाडे जर खातेदारांनी भरले नाही तर त्याच्या लॉकर डिपॉझीटमधून अथवा इतर कोणत्याही ठेव खातेमधून वसुल करणेचा अधिकार बँकेस राहील.
६.८ लॉकर भाडे येणे रक्कमेचा जनरल लीन (Lien) इतर सर्व प्रकारच्या ठेवींवर राहील असे भाडे या ठेवीतून/ इतर खातेमधून घेणेचा अधिकार बँकेस राहील. याबाबत लॉकरधारकांची कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
६.९ बँकेच्या सेवकास त्यांच्या नावे अथवा संयुक्त नावाने अथवा त्यांच्या पत्नीच्या नांवे लॉकर सुविधेचा लाभ दिल्यास, भाडे व लॉकर की (Key) ठेवीमध्ये ५०% सवलत राहील. बँकेच्या कर्मचा-यास एकाच लॉकर सुविधेचा लाभ घेता येईल. एकापेक्षा जादा लॉकर घेतलेस नियमाप्रमाणे भाडे व लॉकर की (Key) ठेव भरणे आवश्यक आहे.
६.१० बँक सध्या खालीलप्रमाणे Sizewise लॉकरभाडे आकारणी करीत आहे. या लॉकरभाडेमध्ये वेळोवेळी बदल करणेचा अधिकार बँकेस राहील.

## सध्याचे लॉकर भाडे

| Present Locker Rent (Yearly) | | |
|---|---|---|
| Type | Size | Rent (Yearly) |
| A Type | A Type (Small) | 500 + GST 18% |
| B Type | B Type (Medium) | 1000+ GST 18% |
| C Type | C Type (Big) | 2000+ GST 18% |

**७) लॉकर परत करणेबाबत –**

७.१ खातेदारास लॉकर नको असेल तर लॉकरधारकांना बँकेकडे लेखी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
७.२ लॉकरधारक लॉकर परत देणार असेल, तर जेवढया कालावधीकरीता लॉकर वापरले असेल तेवढया कालावधीचे लॉकर भाडे आकारले जाईल. उर्वरीत शिल्लक लॉकर भाडे परत करणेत येईल. (GST सोडून भाडे परत केले जाईल.)
७.३ खातेदाराने लॉकरमधील सर्व वस्तू ताब्यात घेवून किल्ली बँकेस परत दिलेनंतरच लॉकर डिपॉझिटची रक्कम परत करणेत येईल.
७.४ संयुक्त लॉकरधारक असेल तर सर्वांची संमत्ती/अर्ज घेवून खाते बंद करणेत येईल.
७.५ लॉकरमधील सर्व ऐवज परत मिळाल्याचे खातेदाराकडून पत्र घेण्यांत येईल व संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.
७.६ बँकेला वाटल्यास बँक लॉकर धारकाला एक महिन्याची अगावू नोटीस देवून; लॉकर रिकामा करणेबाबत कळविणेत येईल. जर लॉकर रिकामे न केलेस बँक सदर लॉकर रिकामे करण्यासाठी दोन साक्षीदाराच्या संमतीने ब्रेक-ओपन करेल व चीज

वस्तू बँकेच्या ताब्यात राहतील. अशावेळी खातेदारांची लेखी मागणी आलेस ती परत केली जाईल. ब्रेक-ओपन चार्जेस व भाडेची रक्कम घेवूनच चीज वस्तू परत देणेत येतील.

**८) लॉकरची किल्ली हरविलेस –**

८.१ खातेदाराकडून लॉकर कि हरविलेस याबाबत बँकेस खातेदारांना लेखी अर्ज करणे आवश्यक आहे. त्यामध्ये लॉकर ब्रेक ओपन करणे व नवीन दुसरी चावी मिळणेबाबतचा उल्लेख करणे आवश्यक राहील. तसेच किल्ली हरविले नंतर जर खातेदाराने लेखी कळविले नसलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी खातेदारावर राहील.

८.२ लॉकर ब्रेक करताना होणारे चार्जेस संबंधित खातेदाराकडून वसूल केल्यानंतरच खातेदाराच्या समोर लॉकर ब्रेक केले जाईल. खातेदारास तोच लॉकर परत वापरणेकरीता दुसरी चावी देणेत येईल.

८.३ लॉकर ब्रेक करतांना इतर कोणताही खर्च/नुकसान झालेस लॉकरधारकाकडून वसूल केला जाईल.

८.४ लॉकरची किल्ली बदलणे/दुसरी करणे, कुलुप बदलणे इ. सर्व कामे बँकेने नेमलेल्या अधिकृत कंपनी/ व्यक्तीकडूनच केले जातील.

८.५ हरविलेली किल्ली खातेदारास परत मिळालेस ती परत करणेची जबाबदारी खातेदाराची राहील.

**९) लॉकरभाडे भरले नसलेस लॉकर ब्रेक-ओपन करणेबाबत –**

९.१ लॉकरधारकाने जर सलग तीन वर्षाचे भाडे भरले नसेल तर बँकेस लॉकर ब्रेक करणेचा अधिकार राहील.

९.२ लॉकरधारक प्रतीवर्ष भाडे भरत असेल अगर नसेल पण त्यांनी लॉकर सलग ७ वर्ष किंवा त्यापेक्षा जादा कालावधीत ऑपरेट केले नसलेस अगर पत्ता सापडत नसलेस तर लॉकर ब्रेक करणेचा अधिकार बँकेस राहील.

९.३ खातेदारांना वेळोवेळी लेखी व तोंडी सूचना देवून देखील त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसेल तर लॉकर ब्रेक ओपन करता येईल.

९.४ लॉकर ब्रेक करतांना योग्य ती रजिस्टर नोटीस व बँक नोटीस बोर्डावर अथवा स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरात देवून लॉकर ब्रेक केले जाईल.

९.५ लॉकर ब्रेकसाठी झालेला खर्च व इतर खर्च खातेदाराकडून वसूल केला जाईल. सदरची रक्कम त्याच्याकडील सेव्हिंग्ज अगर इतर खातेमधून किंवा लॉकर करीताचे डिपॉझिटमधून वसूल केली जाईल.

९.६ लॉकर ब्रेक करताना, दोन साक्षीदार (बँकेचे ग्राहक) समोर लॉकर ब्रेक करण्यात येईल व त्याचा रितसर पंचनामा करुन त्या सर्व वस्तू व इतर कागदपत्रे शाखाव्यवस्थापकाच्या जॉईंट कस्टडीमध्ये राहतील. ज्यावेळी तो खातेदार वस्तू व इतर कागदपत्राची मागणी करेल तेव्हा त्यास परत देण्यांत येईल. सदरच्या वस्तू /कागदपत्रे परत देताना थकीत भाडे बाकी, ब्रेक ओपनचा खर्च व इतर खर्च वसुल करुनच वस्तू परत देणेत येईल. याबाबत खातेदारांनी कोणतीही तक्रार केलेस ती ग्राह्य धरली जाणार नाही.

९.७ साक्षीदाराच्या समक्ष सर्व वस्तू/कागदपत्रे देण्यांत येतील. सदरचे लॉकर दुसऱ्या खातेदारास भाडेने देण्यास पात्र राहील.

९.८ शाखांनी मुख्य कार्यालयाची परवानगी घेवून लॉकर ब्रेक करुन ओपन केले जाईल.

९.९ लॉकरबाबत, बँकेने लॉकर ब्रेक-ओपन करण्याची प्रक्रिया कायदा सल्लागार व रिझर्व्ह बँकेच्या नियमास अधिन राहून कारवाई करणेत येईल.

**१०) लॉकरधारक मयत झालेस –**

१०.१ शाखेकडील लॉकरधारक मयत झालेस, लॉकर खातेवर व्यवहार करणेस बंद केले जातील. शाखेच्या रजिस्टरला लॉकरधारक मयत म्हणून नोंद केली जाईल.

१०.२ वैयक्तिक लॉकरधारकाने एखादया व्यक्तीस नामनिर्देशन केले असेल व लॉकरधारकाचा मृत्यू झाला असेल तर बँकेत अशा नामनिर्देशित व्यक्तीस लॉकरमधील चीज वस्तू काढून घेणेची किंवा येथुनपूढे लॉकरमधील व्यवहार करणेस अधिकार/परवानगी देणेत येईल. नामनिर्देशित व्यक्तीनी रितसर सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन दिलेनंतरच व्यवहार करणेस परवानगी दिली जाईल.

१०.३ जर लॉकरधारकाचे संयुक्त नावांने लॉकर सुरु असेल व त्यावर संयुक्त सहीने व्यवहार करणेचे अधिकार दिलेले असतील व लॉकरधारकांनी वारसाची नोंद केलेली असेल तर अशावेळी एका लॉकर धारकाचा अथवा दोन्ही लॉकर धारक मयत झालेस –

१०.३.१. जर एक लॉकरधारक मयत झालेस, त्यातील उर्वरीत लॉकरधारक व नामनिर्देशित व्यक्तीच्या संयुक्त नावांने लॉकर व्यवहार सुरु करता येईल. नामनिर्देशित व्यक्तीने सर्व कागदपत्राची पूर्तता करुन देणे आवश्यक आहे.

१०.३.२. जर दोन्ही संयुक्त लॉकरधारक मयत झालेस, नामनिर्देशित व्यक्तीनी सर्व कागदपत्राची पूर्तता करुन दिलेनंतर लॉकर व्यवहार करणेस परवानगी दिली जाईल.

१०.४ जर संयुक्त नावांने लॉकर सुरु असेल व त्यावरती वारस म्हणून "Either or Survivor", "Anyone or Survivor" व "Former or Survivor" असे नमूद केलेले असेल तर अशा लॉकर धारकाचा एकाचा किंवा दोघे मयत झालेस बँकेस लॉकरधारकांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे कामकाज करेल व हे कामकाज करताना बँक खालीलप्रमाणे काळजी घेईल –

१०.४.१. जे लॉकरधारक मयत झालेले आहेत त्याची सर्व कागदपत्राची पूर्तता वारसदार (Survivor) यांचेकडून करुन घेतली जाईल.

१०.४.२. बँक खात्री करेल की, जो या लॉकर खातेवरती व्यवहार करणार आहे त्याबाबत सक्षम कोर्टाकडून कोणता आदेश आलेला आहे का?

१०.४.३. बँक, सदर वारसदारास (Survivor) सांगेल की, आपण या लॉकर खातेवर Trustee म्हणून काम पहात आहात. आपणास लॉकरमधील चीज वस्तूवर अधिकार असणार नाही. जे मयत लॉकरधारक आहेत त्यांच्या नातेवाईकांचा अधिकार लॉकरमधील चीज वस्तूवर असणार आहे. लॉकरधारकांनी रितसर मागणी बँकेकडे योग्य त्या कागदपत्राची पूर्तता केलेनंतर त्यांना चीज वस्तू व कागदपत्रे परत केली जातील.

१०.४.४. बँक अशा लॉकरधारकाच्या वारसदारास (Survivor) सांगेल की, कोर्टातून Succession Certificate अथवा आदेश घेवून आलेनंतर लॉकरमधील चीज वस्तू व कागदपत्रे परत केली जातील.

१०.४.५. वरील वारसा (Survivor) संदर्भात बँक योग्य ती काळजी घेवूनच लॉकरमधील चीज वस्तू संबंधित वारस अथवा नातेवाईकांना देणेत येईल. याबाबत काही अडचणी/ वाद निर्माण झाल्यास बँकेकडून कोर्टाच्या आदेशाशिवाय लॉकर उघडले जाणार नाही अथवा त्यामधील चीज वस्तू वारसास (Survivor) दिल्या जाणार नाहीत.

१०.४.६. जेव्हा एखादा व्यक्ती जिवंत आहे किंवा मृत आहे असा प्रश्न पडतो आणि जेव्हा तो/ती जिवंत असता/असती तर त्यांनी निश्चितपणे त्याचे/तिचे ऐकले असते, अशा व्यक्तीने त्याचे/तिचे सात वर्षे ऐकले नाही हे सिध्द होते व ते सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची असेल.

त्याच्या/तिच्या बेपत्ता झाल्याची नोंद, बेपत्ता झालेल्या तारखेपासून सात वर्षे उलटल्यानंतरच मृत्यूचा अंदाज बांधता येईल. अशा प्रकारे, हरविलेल्या ठेवीदाराच्या नामनिर्देशित व्यक्तीने सक्षम न्यायालयासमोर भारतीय पुरावा कायदयाच्या कलम १०७ व १०८ अन्वये ग्राहकाच्या मृत्यूची धारणा स्पष्ट केली पाहिजे. जर कोर्टाकडून ती व्यक्ती मृत झाली आहे असे शाबीत झाले असेल तर, नामनिर्देशित व्यक्ती थकीत रक्कमेची पुर्तता किंवा हरविलेल्या सदस्यांच्या लॉकरमधील वस्तूंसाठी पात्र असेल.

१०.५ जर वारस अज्ञानपालक म्हणून नेमलेला असेल तर अज्ञानपालकाच्या पालन कर्त्यास लॉकर व्यवहार करणेचा अधिकार राहील. याबाबत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता बँकेस करुन देणे आवश्यक आहे.

१०.६ लॉकरधारक मयत झालेनंतर, ज्याच्या वारसदारांनी बँकेकडील छापील फॉर्मवरती माहिती भरुन देणे व सर्व कागदपत्राची पूर्तता करुन देणे इ. गोष्टीं वारसदारांनी पूर्ण केल्याशिवाय लॉकरवरती व्यवहार करता येणार नाही अगर चीज वस्तू लॉकरमधील काढून घेता येणार नाही.

१०.७ सहकारी संस्था/ट्रस्ट/कंपनी/भागीदारी फर्म/LLP इ. लॉकरधारकांपैकी ज्यांना लॉकर व्यवहार करणेचा अधिकार दिलेले आहेत, त्यापैकी कोणी मयत झालेस या लॉकरधारकांनी रितसर सर्व कागदपत्राची पूर्तता करुन (ठराव/ घधउ) दिलेनंतर पुढील व्यवहार करणेस परवानगी दिली जाईल.

१०.८ सहकारी संस्था/ट्रस्ट/कंपनी/भागीदारी फर्म/LLP इ. लॉकरधारकानी व्यवहार करण्याचे अधिकार दिलेले असतील व त्यांनी अधिकार बदल करणार असतील, तर त्यांनी नवीन अधिकार देणाऱ्या व्यक्तींच्या नावाने ठराव/ KYC व इतर कागदपत्रांची पुर्तता करुन देणे आवश्यक आहे.

१०.९ शाखेकडील लॉकरधारक मयत झालेनंतर, त्याच्या वारसदारांनी/हयात असलेल्या व्यक्तींनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेनंतर, शाखा व्यवस्थापकांनी मयत लॉकरधारकाचे लॉकर उघडणेत यावे. या लॉकरमधील सर्व चीज वस्तू, रोख रक्कम, कागदपत्रे इत्यादीची यादी लॉकर धोरणामध्ये नमूद केलेल्या नमुना क्र./Annexure No.७/८/९ (जे लागू

आहे) मध्ये माहिती दोन प्रतीमध्ये भरणेत यावी. यामध्ये कोणताही हलगर्जीपणा करणेत येवू नये. वरील गोष्टींची पुर्तता रिझर्व्ह बँकेकडील परिपत्रक क्र.DoR/LEG/REC/40.09.07.005/2021-22 दिनांक १८/८/२०२१ प्रमाणे करणेत यावी.

१०.१० मयत लॉकरधारकाचे Claim Settlement हे सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेल्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत केले जाईल.

१०.११ मयत लॉकरधारकाचे Claim Settlement बाबतची माहिती ग्राहकसेवा समितीपुढे प्रतीमहा ठेवणेत यावे. तसेच शाखांनी प्रती तिमाही प्रधान कार्यालयाकडे कळविणे आवश्यक आहे. Claim Pending अथवा इतर कोणत्याही कारणांनी Claim Settlement झाले नसलेस ती देखील माहिती प्रधान कार्यालयाकडे देणेची जबाबदारी शाखा व्यवस्थापकाची राहील.

**११) लॉकर रजिस्टर –**

११.१ प्रत्येक खातेदाराचे स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात येईल. यामध्ये तारीख, वेळ व सही, फोटो, सेव्हिंग्ज/इतर खाते नंबर, फोन नंबर नमूद करणेत येईल. नमूना सही तपासूनच खातेदाराचे लॉकर उघडणेस परवानगी दिली जाईल.

११.२ सदरचे रजिस्टर बँकेचे अधिकारी अगर अनुभवी सेवक हाताळेल, त्यांनी त्यावर नोंदी व आपल्या सह्या करणे आवश्यक आहे.

११.३ लॉकरची मास्टर कि शाखाव्यवस्थापकाच्या ताब्यात राहील अगर वेळोवेळी शाखाव्यवस्थापक आदेश देईल त्या सेवकाच्या ताब्यात राहील. त्याचे हाताळणी रजिस्टर ठेवण्यांत येईल.

११.४ बँक, खातेदारांची गोपनियता पाळणेची दक्षता घेईल.

११.५ जर सरकारी आदेशान्वये (आयकर, सेल्सटॅक्स विभाग) अगर इतर कोणत्याही विभागाकडून एखाद्या खातेदाराचे लॉकर सिल करणेबाबत आदेश बँकेस मिळाला तर नियमाप्रमाणे लॉकर उघडता येणार नाही. याबाबत खातेदारास कळविले जाईल.

११.६ रजिस्टर नोंदी अद्यावत ठेवणेची संपुर्ण जबाबदारी संबंधित शाखाव्यवस्थापकाची राहील.

११.७ शाखेकडील शिल्लक असलेली लॉकरची चावी ही शाखा व्यवस्थापक यांचेकडील कस्टडीमध्ये ठेवणेत येईल. लॉकरची Duplicate Master Key ही दुसऱ्या शाखेमध्ये अथवा इतर बँकेच्या लॉकरमध्ये ठेवणेची जबाबदारी शाखा व्यवस्थापक यांची राहील. लॉकर Master Key ही संयुक्त कस्टडीमध्ये राहील.

**१२) वापरात नसलेल्या लॉकर्सबाबत –**

१२.१ लॉकरधारकाने बँकेचे लॉकरचा वापर करणे आवश्यक आहे. जर लॉकर ३ वर्षापेक्षा जादा कालावधीमध्ये वापरत नसल्यास व भाडे वेळेत भरत नसल्यास लॉकर बंद करणेचा अधिकार बँकेस राहील.

१२.२ बँकेचे लॉकर, जर ३ वर्षापेक्षा जादा कालावधीत वापरात नसल्यास लॉकरधारकाला बँकेकडे सध्या असलेल्या पत्यावर पत्र पाठवून लॉकर वापरणेबाबत लेखी कळविले जाईल व शाखेच्या नोटीस बोर्डावर देखील प्रसिध्द केले जाईल. जर लॉकरधारक यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे पूर्तता केली नाही तर बँकेकडून संबंधित लॉकरधारकाच्या नावांने जाहीर नोटीस ज्या-त्या शाखेकडील स्थानिक परिसरातील दैनिक वर्तमान पत्रकामध्ये प्रसिध्द केली जाईल व त्यास १५ दिवसांची मुदत देणेत येईल.

१२.३ वरील नोटीसला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही तर बँकेकडून सदरचा लॉकर ब्रेक-ओपन केला जाईल. ब्रेक-ओपन करताना दोन साक्षीदार (बँकेचे ग्राहक) यांच्यासमोर करणेत येईल व त्याचा रितसर पंचनामा करुन त्या सर्व चीज वस्तू व इतर कागदपत्रे सील करुन ते शाखा व्यवस्थापकांच्या जॉईंट कस्टडीमध्ये सील करुन ठेवणेत येतील. सदरच्या चीज वस्तू परत मिळणेसाठी संबंधित लॉकरधारकाने लेखी मागणी केलेस, साक्षीदारांच्या समक्ष चीज वस्तू/कागदपत्रे परत देणेत येतील. सदरच्या चीज वस्तू व कागदपत्रे परत देताना भाडे बाकी व ब्रेक-ओपन खर्च वसुल केल्याशिवाय चीज वस्तू परत देणेत येणार नाही. याबाबतची कोणतेही तक्रार केलेस ती ग्राहय धरली जाणार नाही.

१२.४ लॉकर ब्रेक-ओपन करताना, पुराव्यासाठी त्याचे व्हिडीओ चित्रीकरण करणेत येईल व ते सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापकांची राहील व याबाबतची नोंद लॉकर रजिस्टरमध्ये करणेत येईल.

THE ASHTA PEOPLE'S CO-OP. BANK LTD. • ASHTA • 24087 20/2/60

## १३) इतर बाबी –

१३.१ बँकेने वेळोवेळी लॉकर भाडेने देणेसंबंधी केलेले नियम/बदल हे लॉकरधारकास लागू राहतील.

१३.२ शाखेने स्थलांतर करताना किंवा बंद करताना बँकेकडे त्यांनी नोंदविलेल्या पत्यावर २ महिने आधी कळविणेत येईल. याबाबतची जाहीर नोटीस दैनिक वृत्तपत्रामध्ये (Local Newspaper) देणेत येईल. नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा एखादया अघटित घटनामुळे जर बँकेस लॉकर स्थलांतर करावे लागलेस शक्य तेवढया कालावधीत लॉकरधारकास संपर्क केला जाईल.

१३.३ लॉकर धारकांना लॉकरचा वापर करण्यासाठी दिलेल्या चावीची (Key) शहानिशा करणेसाठी बँक त्या चावीवर (Key) शाखेचे नांव एम्बॉस केलेले असल्याची खात्री करुनच लॉकर धारकास लॉकर उघडणेसाठी परवानगी दिली जाईल. लॉकरधारकास प्रथम लॉकर देण्याअगोदर त्या चावीवर (Key) Emboss करणेची जबाबदारी शाखा व्यवस्थापकांची राहील.

१३.४ लॉकरधारकाला भाडे घेवून सदर लॉकर पोटभाडयाने देता येणार नाही. तसेच लॉकरचा वापर स्फोटक, विनाशकारी व बंदीच्या वस्तू ठेवणेकरीता करणेचा नाही. जर या कारणासाठी अथवा इतर बेकायदेशीर कामाकरीता लॉकरचा वापर केलेस तो लॉकर बंद करणेचा अधिकार बँकेस असेल, जर याबाबत बँकेस काही तोशीष लागलेस त्याची सर्व जबाबदारी लॉकरधारकाची राहील. बँकेचे लॉकर फक्त महत्वाच्या व मौल्यवान वस्तू, दस्ताऐवज इ. ठेवणेसाठी करणेचा आहे.

१३.५ लॉकरसंबंधी कोणतीही नोटीस अगर पत्रव्यवहार पोष्टाने, लॉकरधारकाने बँकेकडे त्यांनी नोंदवलेल्या पत्यावर बँकेने केलेस ती नोटीस अगर पत्रव्यवहार त्यास योग्यप्रकारे लागू केला असे समजण्यात येईल. तो दिलेल्या पत्यावर आढळून आला नाही तर बँकेच्या नोटीस बोर्डावर त्याबद्दल जाहीर नोटीस प्रसिध्द केली जाईल. त्यामुळे लॉकरधारकाने आपला बदललेला पत्ता, पुराव्यासह, बँकेकडे वेळोवेळी नोंद करणे बंधनकारक आहे.

१३.६ एखादया वेळेस बँकेने अथक व अविश्रांत परिश्रम घेवूनही परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे बँकेस अशक्य झाल्यास उदा. दळणवळणाची साधने उपलब्ध न होणे, शांतता भंग, पेमेंट किंवा डिलीव्हरी सिस्टिममध्ये बिघाड, यंत्रसामग्रीचा नाश, आग, पूर, नैसर्गिक आपत्ती किंवा दैवाधिन घटना, कॉम्प्युटरमधील बिघाड, संप या किंवा तदनुषंगिक अशा अनेकविध घटनांमुळे वेळेत काही बाबींची पूर्तता करताना बँक असमर्थ असल्यास बँक घडलेल्या गोष्टीस जबाबदार राहणार नाही, कारण त्या नैसर्गिक असतील. तसेच लॉकरमधील वस्तूचा विमा केला जात नसल्याने त्याचा क्लेम मिळणार नाही.

१३.७ ज्या त्या वेळी लॉकर भाडेची रक्कम वसुल करणेची जबाबदारी शाखाव्यवस्थापक यांची राहील.

१३.८ लॉकर भाडे येणे दाखवून उत्पन्नात घेण्यात येवू नये. प्रत्यक्ष वसुल झालेले भाडेच उत्पन्नात घेण्यात येईल.

१३.९ लॉकरधारकाच्या दोषामुळे/निष्काळजीपणामुळे लॉकरमधील वस्तूंचे काही नुकसान झालेस बँकेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

## १४) जोखीम, पारदर्शकता व ग्राहक प्रबोधन –

१४.१ लॉकरधारकास सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील, उदा. पाणी, लाईट, पंखा, इ.

१४.२ खातेदाराची कोणतीही तक्रार/सूचना असेल तर त्यास तक्रार पेटी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१४.३ लॉकरधारकाच्या माहितीसाठी लॉकर भाडेचा दर, इतर चार्जेस इ. बाबतची माहिती शाखेमध्ये व बँकेच्या वेबसाईटवरती प्रसिध्द करणेत येईल.

१४.४ लॉकरधारकाच्या माहितीकरीता लॉकर करारपत्राचा नमुना बँकेच्या वेबसाईटवरती प्रसिध्द करणेत आलेला आहे.

१४.५ बँकेने लॉकर संबंधी स्वतंत्र धोरण केलेले असून त्यामध्ये लॉकर व्यवहार कसे करावयाचे, Standing Operating Procedure (SoP) वारस नोंदी, मयत Claim Settlement इ. बाबीचा समावेश करणेत आलेले आहे. लॉकर धोरण बँकेच्या वेबसाईटवरती ग्राहकांच्या माहितीकरीता प्रसिध्द करणेत आले आहे.

१४.६ लॉकरधारकाच्या माहितीकरीता लॉकरमध्ये कोण-कोणती वस्तू आहे हे बँकेस माहिती नसल्याने त्या लॉकरचा विमा इन्शुरन्स कंपनी करत नाही. त्यामुळे लॉकरचा विमा उतरविता येत नाही. याबाबतची स्पष्ट माहिती/पूर्वकल्पना लॉकरधारकास देणेत येईल. यासंदर्भातील माहिती लॉकरधारक व बँक यांच्यातील करारामध्ये देणेत येईल.

१४.७ लॉकर व्यवहाराचे कामकाज झालेनंतर सर्व लॉकर व्यवस्थितरित्या ग्राहकांनी बंद केले आहे का? याची शहानिशा शाखा व्यवस्थापक अगर संबंधित सेवकांनी करणेची जबाबदारी राहील. एखादे लॉकर बंद झाले नसल्याचे निदर्शनास आले तर ते खातेदाराच्या निदर्शनास सत्वर आणून दिले जाईल. याबाबत काही तोशीष/नुकसान झालेस खातेदाराची जबाबदारी राहील. यासंदर्भात कोणतेही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

## १५) भरपाई व जबाबदारी –

१५.१ बँकेच्या ज्या-ज्या शाखेमध्ये ग्राहकांच्यासाठी लॉकर सुविधा देणेत आलेली आहे. या शाखेमध्ये रिझर्व्ह बँकेच्या नियामाप्रमाणे आवश्यक त्या सर्व सुरक्षितेची काळजी घेतलेली आहे. उदा.सीसीटिव्ही, वॉचमन, इतर सुरक्षा व्यवस्था, महत्वाचे फोन नंबर (पोलिस स्टेशन/अग्निशामक), अलार्म सिस्टिम इ.

१५.२ लॉकर सुविधा देणाऱ्या सेवकांना आवश्यक ते सर्व प्रशिक्षण/माहिती देणेत आलेली आहे. तसेच आवश्यक ती सुरक्षा यंत्रणा देखील निर्माण केलेली आहे.

१५.३ अनधिकृत व्यक्तीना प्रवेश देणेत येणार नाही, लॉकरधारकाची सही तपासणी, फोटो, इ. गोष्टींची पूर्तता केल्यानंतर लॉकर उघडणेस परवानगी दिली जाईल.

१५.४ बँकेच्या सेवकांच्याकडून कोणताही गैरव्यवहार/अफरातफर इ.गोष्टी घडलेस बँकेच्या सेवानियमाप्रमाणे सेवकांवर कायदेशीर कारवाई करणेत येईल.

१५.५ चोरी/दरोडे इ. गोष्टी बँकेत घडू नये याकरीता योग्य ती काळजी प्रत्येक शाखेमध्ये घेणेत येईल.

## १६) भुकंप/पूरपरिस्थिती/वादळ या स्थितीत बँकेची जबाबदारी –

१६.१ भुकंप/महापूर/दंगल/वादळ इ. सारख्या नैसर्गिक घटना अचानक घडल्याने शाखेतील लॉकर व्यवस्थेत काही अडचण/नुकसान झालेस व त्यामुळे लॉकरधारकाची कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेस त्यासंदर्भातील कोणतीही जबाबदारी बँकेची राहणार नाही. याबाबत बँक जेवढी काळजी घेता येईल तेवढी घेण्याचे प्रयत्न करेल. परंतु वरील आपत्तीमुळे लॉकरधारकाचे नुकसान झालेस बँक कोणतीही जबाबदारी घेणार नाही. इन्शुरन्स कंपनी लॉकरधील वस्तूचा विमा करीत नाही.

## १७) चोरी/दरोडा/सेवकांकडून अफरातफर/आग/धोकाधडी या स्थितीत बँकेची जबाबदारी –

१७.१ चोरी/दरोडा/धोकाधडी याबाबतची योग्य ती सुरक्षा /खबरदारी बँकेची राहील.

१७.२ बँक योग्य ती खबरदारी घेवून देखील जर वरीलप्रमाणे कोणतीही घटना घडल्यास व लॉकरधारकाचे नुकसान झालेस अशी नुकसान-भरपाईची जबाबदारी बँकेची राहणार नाही.

चोरी/दरोडा/इमारत पडणे/गैरव्यवहार/आग इ. कारणामुळे लॉकरधारकाचे नुकसान झालेस व हे नुकसान बँकेच्या चुकीमुळे/निष्काळजीमुळे झालेले असेल व ते पुराव्यानिशी सिध्द झालेस तर बँक लॉकरधारकास भरपाई देईल. अशी नुकसान-भरपाई ही लॉकर भाडेच्या १०० पट इतकी जास्तीत-जास्त राहील. जर बँकेची चुक नसलेस व अशा घटना घडल्याने लॉकरधारकाचे नुकसान झालेस बँक नुकसान भरपाईस पात्र असणार नाही.

१७.३ बँकेच्या सेवकांमुळे गैरव्यवहार/अफरातफर झालेस व ते पुराव्यानिशी सिध्द झालेस लॉकरधारकाला दयावी लागणारी नुकसान-भरपाई ही लॉकर वार्षिक भाडेच्या १०० पट इतकी जास्तीत जास्त राहील.

उदा. लॉकर भाडे वार्षिक रु.१२०० असेल तर त्यास नुकसान भरपाई १२०० X १०० = १,२०,०००/- इतकी जास्तीत-जास्त राहील.

## १८) विमा –

चोरी/नैसर्गिक आपत्ती/दरोडा इ. मुळे होणाऱ्या नुकसानीचा विमा करणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे बँक प्रतीवर्ष बँकेच्या मालमत्तेचा विमा उतरवेल.

१८.१ लॉकरधारकाकडून लॉकरमध्ये कोणत्या वस्तू ठेवल्या आहेत याची खातरजमा करण्याची किंवा नोंद ठेवण्याची जबाबदारी बँकेची नसल्यामुळे, लॉकरधारकाने लॉकरमध्ये ठेवलेल्या वस्तूंसाठी विमा उतरविणे बँकेवर बंधनकारक असणार नाही.

## १९) ग्राहक प्रबोधन व प्रसिध्दी –

१९.१ ग्राहकांना लॉकरबाबतची माहिती होणेसाठी लॉकर करार करेल व त्याची झेरॉक्स प्रत खातेदारास देणेत येईल.
१९.२ लॉकरची माहिती/नियम व अटी इ. रितसर माहिती बँकेच्या वेबसाईटवरती प्रसिध्द करेल.
१९.३ लॉकर भाडे संदर्भातील माहिती शाखा नोटीस बोर्डावर व वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करेल.
१९.४ लॉकर धोरण ग्राहकांच्या माहितीसाठी वेबसाईटवरती प्रसिध्द केले जाईल.

या सर्व नियंमामध्ये वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील व झालेले बदल वेळोवेळी बँकेच्या वेबसाईटवर व नोटीस बोर्डावर प्रसिध्द केले जाईल.

****************

दि आष्टा पीपल्स को-ऑप. बँक लि. आष्टा करिता.

मुख्य कार्यकारी अधिकारी